क्र.आव्य/बोट निविदा/काचि- 915 /२०१३
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा
दिनांक :- २० मार्च, २०१३

# जाहिरात

# जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा

नैसर्गिक आपत्ती अतिवृष्टिमध्ये जिल्ह्यातील पुरपरिस्थितीत अडकलेल्या पुरग्रस्तांची मदत व सुटका करण्याकरिता आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विहित पध्दतीचा अवलंब करुन जिल्ह्याकरिता एक यांत्रिक फायबर बोट रु.४.९५ लक्ष मर्यादेपर्यंत खरेदी करण्यास अटिंच्या अधीन राहून बंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहे. निविदा जमा करण्याची शेवटची तारिख २८.३.२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे जमा करावी. प्राप्त निविदा त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता मा.जिल्हाधिकारी यांचे दालनात उघण्यात येईल.

याबाबतची सविस्तर माहिती निविदा पत्रक, अटी व शर्ती www.wardha.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उपरोक्त दिनांक व वेळेनंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

टिप :- निविदा फॉर्म जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे रु.५००/- मध्ये उपलब्ध राहिल.

जिल्हाधिकारी, वर्धा

प्रतिलीपी :-

१. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी यांना माहिती तथा सदर जाहिरनामा व निविदा पत्रक जिल्हा कार्यालयाचे वेबसाईडवर प्रसिध्द करावे.
२. जिल्हा माहिती अधिकारी यांनी राज्यस्तरावर व स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.
३. जिल्हा नाझर ,जिल्हा कार्यालय वर्धा यांना माहिती तथा सदर जाहीरनाम्याची एक प्रत जिल्ह्याचे नोटिस बोर्डवर लावुन प्रसिध्द करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

जिल्हाधिकारी, वर्धा

D:\chetan\DDMO-2012\ddmo EQP-2012.doc

# अटी व शर्ती

१. प्रवासी क्षमता - २० प्रवासी क्षमता असावी.

२. साईज - २० फुट X६ फुट ६ इंच X२ फुट (लांबी २० फुट रुंदी ६ फुट ६ इंच, उंची २ फुट)

३. फायबर बॉडी - ४ मी.मी. तसेच बोटीमध्ये प्रवासी बसण्यासाठी सीटकम एअर बॉक्स असावेत.

४. बोटीला आऊट बोर्ड इंजिन (ओबीएम) बसविण्याची तसेच वल्हवून चालविण्याची सोय असावी.

५. इंजिन (ओबीएम) ९.९ एच.पी.क्षमतेचे आय.एस.आय. मार्क चे असावे.

६. वल्हे २ नग, वल्ही लॉक २ नग, नॉयलॉन दोर १२ एम.एम.जाडीचा ५० फुट, लाईफ रिंग ५ नग, लाईफ जॅकेट ५ नग इत्यादि साहिल्य बोटीसह देणे आवश्यकआहे. तसेच बोट वाहतुक ट्राली सोबत द्यावी लागेल.

७. वरिल सर्व साहित्य व बोट जिल्ह्यातील ज्या भागत ठेवावयाची आहे. तिथे जागेवर पोहचविणे बंधनकारक राहिल.

८. बोटीचा डेमो (प्रात्याक्षिक) करुन दाखविणे आवश्यक आहे.

९. दरपत्रकात सर्व करांसह एकत्रित किंमत दर्शवावी.

१०. बोटीचा वाहतुक खर्च वेगळा देण्यात येणार नाही.

११. बोटीवर सांगण्यात आलेले नाव पेंट करुन देणे बंधनकारक राहिल.

१२. सादर केलेल्या देयकाचे भुगतान मा.जिल्हाधिकारी यांचे मंजुरीनंतर धनादेशव्दारे करण्यात येईल.

१३. पुरवठा आदेश दिल्यानंतर ३० दिवसाचे आत पुरवठा करणे आवश्यक राहिल. त्यानंतरच्या प्रत्येक दिवसास प्रति दिवस प्रमाणे मा.जिल्हाधिकारी सांगतील त्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१४. तांत्रिक निविदा मध्ये, निविदा धारकाची नोंदणी, पॅनकार्ड, विक्रिकर नोंदीण पत्र, वार्षिक ताळेबंद पत्र साहित्याचे फोटो, ब्रोशर, इ.माहिती जोडणे आवश्यक आहे.

१५. निविदा सादर करताना अनामत रक्कम रु.१०,०००/- चा (अक्षरी रु.दहा हजार ) राष्ट्रियकृंत बँकेचा वर्धा शाखेत देय असणारा डी.डी.जिल्हाधिकारी, वर्धा यांचे नावाने तांत्रिक निविदा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. निविदापत्रक खरेदीबाबत कार्यालयाने ठरवून दिलेल्या रकमेनुसार सदर रक्कम शासन जमा करुन खरेदी करण्यात आलेली निविदाच स्विकारण्यात येईल. शासकीय पावती क्र.निविदेत नमुद करुन पावती छायाकिंत प्रत निविदा सोबत जोडणे आववश्य आहे. बंद निविदा पाकिटावर ठळक अक्षरावर आपत्ती व्यवस्थापन बोट खरेदी निविदा असे स्पष्ट लिहावे.

१७. प्राप्त निविदा दि.२८.३.२०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे उपस्थित अधिकारी यांचे समोर उघडण्यात येईल. निविदा धारक /त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे बंधनकारक राहिल.

१८. कंपनीचे प्राधिकृत केलेल्याबाबतचे हमीपत्र जोडणे आवश्यक राहिल.

१९. साहित्यात बिघाड झाल्यास वेळेच्या आत दुरुस्ती करुन देणे बंधनकारक राहिल.

२०. साहित्याची ने आण करताना होणा-या नुकसानीस पुरवठादार सर्वस्वी जबाबदार राहिल.

२१. साहित्याचे तपासणी हमीपत्र व सोबतच संपुर्ण माहितीपुस्तिका जोडणे आवश्यक राहिल.

२२. साहित्याची देखभाल दुरुस्ती गॅरंटी पिरेड नंतरसुध्दा १ वर्षापर्यंत देखभाल करणे बंधनकारक राहिल.

दिनांक :- 20.3.13

जिल्हाधिकारी, वर्धा